**मे. लॉयड मेटल्स अ‍ॅण्ड एनर्जी लि., प्लॉट नं. ए-१ व २, एमआयडीसी घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित मे. लॉयड मेटल्स अ‍ॅण्ड एनर्जी लि., प्लॉट नं. ए-१, एमआयडीसी कोनसारी, ता. चामोर्शी जि. गडचिरोली येथे १९० टन/दिवस क्षमतेचा स्पॉन्ज आयर्न संयंत्र, ४ मेगावॅट क्षमतेचा WHRB कॅप्टीव्ह वीज निर्मिती प्रकल्प व ९०००० टन/वर्ष क्षमतेचा आयर्न ओर बेनिफिकेशन संयंत्र उभारणीबाबतच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचे इतिवृत्त**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | **२०/०८/२०१९** |
| **वेळ** | : | **सकाळी११.०० वाजता** |
| **स्थळ** | : | **प्रकल्प स्थळ, प्लॉट नं.ए-१, एमआयडीसी कोनसारी, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली.** |

**<u>प्रस्तावना:-</u>**

मे. लॉयड मेटल्स अ‍ॅण्ड एनर्जी लि., प्लॉट नं. ए-१ व २, एमआयडीसी घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर यांनी त्यांच्या प्रस्तावित मे. लॉयड मेटल्स अ‍ॅण्ड एनर्जी लि., प्लॉट नं. ए-१, एमआयडीसी कोनसरी, ता. चामोर्शी जि. गडचिरोली येथे १९० टन/दिवस क्षमतेचा स्पॉन्ज आयर्न संयंत्र, ४ मेगावॅट क्षमतेचा WHRB कॅप्टीव्ह वीज निर्मिती प्रकल्प व ९०००० टन/वर्ष क्षमतेचा आयर्न ओर बेनिफिकेशन संयंत्र उभारणीबाबतच्या प्रस्तावाबाबत प्रकल्पधारकाने पर्यावरण मंजूरीकरिता पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासनमुंबई ,मंत्रालय , यांना अर्ज सादर केल्यानंतर राज्य पर्यावरण मुल्यांकन तज्ञ समिती (SEAC) यांनी त्यांच्या दि०३ ..०४.२०१८ रोजी झालेल्या १४९व्या२-दिवस) रा( बैठकीमध्ये सदर प्रस्तावीत प्रकल्पास प्राथमिक पत्र(TOR) जारी केले व पर्यावरण आघात मुल्यांकन (१-सहपत्र) २००६ अधिनियम च्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जाहीर जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे यांचा सामावेश करून नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर मप्रनि मंडळचंद्रपूर व , चंद्रपूर यांच्या समन्वयाने दि ,जिल्हाधिकारी. २०.०८.२०१९ ही तारीख निश्चित करण्यात आलीपर्यावरण आघात मुल् .यांकन अधिनियम मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे २००६ १९ .मप्रनि मंडळाने दि ,सदर जनसुनावणीची जाहीर सुचना.०७.२०१९ रोजीच्या मराठी दैनिक"लोकसत्ता" व दैनिक "देशोन्नती" व इंग्रजी दैनिक "द हितवाद" मध्ये प्रसिध्द केली . ,वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या सुचना आक्षेप इत्यादी ,विचार ,टीकाटिप्पणीया कार्यालयाकडे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनाकरीता/ संबंधितांच्या अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली.
६. जिल्हा परिषद, गडचिरोली.
७. जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली.
८. क्षेत्रीय व्यवस्थापक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, गडचिरोली, ता. जि. गडचिरोली.
९. उप-विभागीय कार्यालय, चामोर्शी, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली.
१०. तहसिल कार्यालय, चामोर्शी, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली.
११. पंचायत समिती कार्यालय, चामोर्शी, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली.
१२. गट-ग्रामपंचायत कार्यालय, सोमनपल्ली (धर्मपूर व रायपूर), ता. चामोर्शी, जि. गडचिरोली.
१३. ग्रामपंचायत कार्यालय, जयरामपूर, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली.
१४. ग्रामपंचायत कार्यालय, कोनसारी, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली.
१५. गट-ग्रामपंचायत कार्यालय, बहादूरपूर (रामकृष्णपूर), ता. चामोर्शी, जि. गडचिरोली.
१६. गट-ग्रामपंचायत कार्यालय, काढोली (रामपूर), ता. चामोर्शी, जि. गडचिरोली.
१७. गट-ग्रामपंचायत कार्यालय, चंदनखेडी (उमरी), ता. चामोर्शी, जि. गडचिरोली.

वरील अनुक्रमांक ५ ते १७ वर नमूद शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर या जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्पामुळे बाधित अथवा संबंधित व्यक्तीना त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

जनसुनावणीचे स्थळ प्लॉट नं. ए-१, एमआयडीसी कोनसारी, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली निवडण्यात आले कारण हे स्थळ प्रकल्पाच्या ठिकाणी असुन संबंधितांना सोईस्कर असल्याने या ठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकनअधिसूचने नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत केली.

| | | |
|---|---|---|
| १) श्री धनाजी पाटील,<br>अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी,गडचिरोली | - | **अध्यक्ष,** |
| २) श्री मधुकर लाड ,<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळचंद्रपूर , | - | **सदस्य** |
| ३) श्री,उमाशंकर भादूले.<br>प्रभारी उप प्रादेशिक-अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळचंद्रपूर , | - | **समन्वयक** |

सदर प्रकल्पाबात प्राप्त झालेल्या तक्रारी, आक्षेप, निवेदन, प्रश्न व जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा आदेश अनुक्रमे सहपत्र-२ व३ प्रमाणे सोबत जोडलेले आहे.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरुवातीस श्री. उमाशंकर भादुले, प्रभारी उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहीती दिली. त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक,सुचना,विचार,आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली.तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल असे सांगितले. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

जनसुनावणी समितीचे अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली यांनी उपस्थित जनसमुदायास मे. लॉयड मेटल्स अँण्ड एनर्जी लि., प्लॉट नं. ए-१ व २, एमआयडीसी घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित मे. लॉयड मेटल्स अँण्ड एनर्जी लि., प्लॉट नं. ए-१, एमआयडीसी कोनसारी, ता. चामोर्शी जि. गडचिरोली येथे १९० टन/दिवस क्षमतेचा स्पॉन्ज आयर्न संयंत्र, ४ मेगावॅट क्षमतेचा WHRB कॅप्टीव्ह वीज निर्मिती प्रकल्प व ९०००० टन/वर्ष क्षमतेचा आयर्न ओर बेनिफिकेशन संयंत्राच्या प्रस्तावाबाबत आपल्या सुचनाआक्षेप घेऊन पुढे यावे ,विचार , ,अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यातआपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना व आक्षेप या अधिसूचनेत नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना कळविण्यात येतील, सदर सुनावणीचे छायाचित्रीकरण व व्हिडीओ शुटींग म.प्र.नि.मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे, तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जन सुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले.तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता

सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत बनविते वेळी नमुद करण्यात येतील. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांनी प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचे शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

तद्नंतर प्रकल्पधारकाच्या वतीने श्री.मोहन रहांगदाले, पर्यावरण सल्लागार यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल मराठी व इंग्रजी भाषेत सादर केलासादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बा.बी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षाश-रेखांश, नकाशा, बुडीत क्षेत्र, लाभ क्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्टय, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमिन वापर, भुकंप स्थिरता
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांचा प्रकल्पामुळे होणारा विकास
- प्रकल्पाचे विश्लेषण निष्कर्ष ,सारांश,
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषन
- हवा.विस्थापन इत्यादी बाबतची माहीती,ध्वनी,जमिन,पाणी,
- नियोजीत प्रकल्पांमुळे हवाजैवविविधता यावर होणारे परिणाम ,विस्थापन,पाणी, व्यवस्थापन.
- प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहीती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले कीप्रश्न व उत्तरे घे/सुचना/यानंतर आक्षेप ,तले जातीलआपणांस . सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प ,विनंती की .धारकाने द्यावे

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

१) <u>श्री. चंद्रकांत बोंगिरवार, उपसरपंच,</u>

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कोनसारी गावातील व आजुबाजुच्या गावातील लोकांना रोजगार मिळाला पाहिजे. प्रकल्पाला विरोध नाही. प्रकल्प १००% झाला पाहिजे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, गडचिरोली, कोनसरी व एटापल्ली तालुक्यातल्या लोकांनाच प्राधान्य देणार आहे. |

२) श्री. संतोष कुडुरवार, एटापल्ली, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | एटापल्ली परिसरात माईन असल्यामुळे येथील ८०% लोकांना रोजगार मिळाला पाहिजे. | एटापल्ली व आसपासच्या लोकांनाच रोजगार मिळाला पाहिजे कारण एटापल्ली परिसरात माईनिंगचे काम सुरू आहे व बाहेरचे लोक येणार नाहीत. प्लांटमध्ये एटापल्ली व कोनसरीच्या लोकांनाच प्राधान्य देणार आहे. |

३) श्री.अनिल तिडके, युवा गर्जना संस्था, गडचिरोली:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वेस्ट वॉटर ट्रिटमेंट प्लांट करणार की तसेच खराब पाणी नदीमध्ये जाणार का? ग्रीन बेल्ट कोणत्या प्रकारे विकसित करणार? | वेस्ट वॉटर निघणार नाही कारण पाण्याचा पुनर्वापर करणार. घरगुती सांडपाणी प्रक्रिया करून वृक्षारोपणाकरिता वापरणार. ११ एकर जागेमध्ये वृक्षारोपण करणार प्लांट लेआऊट फायनल झाल्यावर स्थानिक वन विभागाशी सल्ला करून झाडांची लागवड करण्यात येईल. |
| २) | खाणीचे काम ७ महिन्यांपासून बंद आहे. बेसिक पे-स्केलचा अर्थ काय आहे, काहीतरी minimum पे कंपनीने द्यावे. | खाणीचे काम व्यवस्थित चालु व्हावे यासाठी प्रशासन व्यवस्था करीत आहे. केवळ पाच दिवस काम चालते. आठ महिन्यांपासून काम बंद असल्यामुळे कंपनीला व्यवस्थापन अवघड झाले आहे. काम व्यवस्थित सुरू झाल्यावर कायद्याप्रमाणे किमान वेतन देण्यात येईल. |

४) श्री. शंकर अकरेड्डीवार, पंचायत समिती सदस्य, आष्टी, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | स्थानिक लोकांना रोजगार मिळावा व प्रदूषणाची तक्रार होणार नाही हे कंपनीने पहावे. | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी आश्वासन दिले की, कंपनी याच ठिकाणी होईल. इथल्या प्रकल्पग्रस्त लोकांना प्राधान्य मिळेल. |
| २) | कंपनीसाठी शेती दिलेली आहे व शेतकरी निराधार झाले आहे. कंपनी इथेच झाली पाहिजे. | |

५) **श्री. राजेंद्र मित्तलवार,**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | २ किमी पर्यंतचे कास्तकारांना रोजगार मिळावा. त्यांना रोजगार मिळाला नाही व त्यांच्या शेतीवर परिणाम झाल्यावर त्यांनी काय करावे हे सांगावे. | प्रकल्पामुळे शेतीला नूकसान होणार नाही. उलट CSR कार्यक्रमांतर्गत रू. २ कोटी हे सेंद्रीय शेती व दुग्धपालनात खर्च केले जातील. दूषित पाणी बाहेर निघणार नाही. रू. १२४० लाखांची यंत्रणा हवा प्रदूषण निवारणासाठी लावणार. |

६) **श्री. स्वप्निल वैरागडे:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | एटापल्ली पासून १५ किमी माईनिंगसाठी जावे लागते, आम्हाला परमनंट केव्हा करणार? | माईनिंग जास्त वेळ बंद असते. ते जेव्हा सुरळीत चालू राहणार त्यावेळी याचा विचार करू. |

७) **श्री. देवेंद्र जयकर, जयरामपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | स्थानिक लोकांना प्राधान्य द्यावे, पेपर मिल प्रमाणे बाहेर प्रदेशातील (जसे की आगरा), लोकांना घेऊ नये. | स्थानिक लोकांनाच प्राधान्य राहील. Technical Expert लागले तर ते बाहेरचे राहतील. |

८) **श्री. मधुकर लाड, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प प्रवर्तकाने स्थानिक लोकांना प्रशिक्षणाला पाठवावे. | आयटीआय मध्ये शासनाच्या कौशल्य विकास माहीमेअंतर्गत कार्यक्रम चालतो. लोकांनी आयटीआय मध्ये प्रवेश घ्यावा. |

९) **श्री. मिथुन जोशी, पिपलीओटी रहिवासी:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आम्ही खाणीवर कामावर येऊन परत जातो, | माईनिंग चे काम जास्त वेळ बंद असतं. |

| | | |
|---|---|---|
| | आम्हाला कायमस्वरूपी रोजगार केव्हा मिळणार? | जेव्हा सुरळीत होईल तेव्हा याबाबत काही करता येईल. |

## १०) श्री. मधुकर लाड, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

| अ. क्र. | सूचना |
|---|---|
| १) | खाणीचे काम बंद राहिल्यास कंपनीने लोकांना आधी  अवगत करावे ज्यामुळे लोकांचा जाण्या-येण्याचा खर्च वाचेल. |

## ११) श्री. रविंद्र पु. अंबडवार ताटे:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पावर लागणारे ट्रक, पोक्लेन इत्यादी मशीनरी बेराजगारांना प्रत्येकी एक या प्रमाणे देऊन कामावर घ्यावे व बेरोजगारी दूर करावी. इंजिनिअर्स व बॉलर ऑपरेटर्स हे या परिसरातील असावे व त्यांना प्रशिक्षण द्यावे व त्यांना रोजगार द्यावा. ठेकेदार व मजूर या परिसरातील असावे. | लवकरात लवकर प्रकल्पाचे काम चालु करू. |

## १२) श्री. संतोष कुडूरवार:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | खाणीचे काम सात महिन्यांपासून काम बंद आहे मी बेरोजगार आहे याबद्दल काही सांगा. | प्रशासनकीय अडचणींमुळे इथली व्यवस्था काही वेगळी असल्यामुळे काम बंद आहे. काम लवकर चालु व्हावे याचा प्रयत्न चालु आहे. |

## १३) श्रीमती रूपाली:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पात महिलांना किती टक्के आरक्षण राहील व त्यांना किती टक्के रोजगार राहील. | प्रकल्पामध्ये महिलांसाठी आरक्षण नसतं. त्यांना गुणवत्तेप्रमाणे कार्य मिळतं. स्थानिक महिलांना प्रशिक्षण देऊन रोजगार देऊ. |

१४) **श्री. प्रसाद श्रीहरी, एटापल्ली:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | खाणीचे काम ४ महिन्यांपासून काम बंद आहे कारण सरकार प्रकल्पासोबत नाही. सरकार आम्हाला काम मिळू देऊ इच्छित नाही का? | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, प्रशासन कंपनीला, लोकांना सहाय्य करणार. म.प्र.नि. मंडळ कडून कुठलीही अडचण नाही. |
| २) | सरकार सुरक्षा देईल तर काम मिळेल. केवळ तीन तास काम देतात. सात महिन्यांपासून काम बंद आहे व वेतन नाही याला जबाबदार कोण? | अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली, यांनी सांगितले की, कंपनीला सुरक्षा देण्यात येईल. काम बंदचा प्रश्न सोडविला जाईल. |

१५) **श्री. अभय पुण्यमुर्तीवार, एटापल्ली:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कोनसरीत प्लांट लावणे हे शासनाने की कंपनीने ठरविले? पीडीत एटापल्ली जागेत सुनावणी होईल का? | सन २००८ साली शासनाने पत्र दिले की, एटापल्लीत हा कारखाना लावण्यास जागा नाही. कोनसरीत जागा मिळाल्यामुळे इथे घेतली. अहेरीत जागा मिळाली नाही. कोनसरीत १२५ एकर जागेत कारखाना राहील व यामुळे दुसरीकडे जनसुनावणी होणार नाही. |
| २) | आम्ही जागा द्यायला तयार आहोत. ११ प्रकल्पग्रस्त गावांची सुनावाणी घेण्यात यावी, त्यांना रोजगार द्यावा. आम्हाला कायमस्वरूपी रोजगार पाहिजे. ३६५ दिवस कंपनीचे काम चालेल याची मी हमी देतो. | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली यांना मनोगत व्यक्त करण्याची विनंती केली. अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली यांनी सांगितले की, कंपनीला लागणाऱ्या पोलिस संरक्षणाचा प्रश्न सोडवू. |

१६) **श्री. राकेश दंडीगवार, ग्राम पंचायत सदस्य:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कोनसरीच्या ४० शेतकऱ्यांनी रोजगाराच्या उद्देशाने जमीनी दिल्या. त्यांना किती महिन्यात रोजगार देणार. | सर्व मजुरी नंतर लगेच काम सुरू करण्यात येईल. ज्या शेतकऱ्यांनी जमीनी दिल्या त्यांना कायमस्वरूपी रोजगार दिला जाईल. |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर विचारण्याचे आव्हान केले. मात्र कोणीही तद्नंतर प्रश्न/सूचना/आक्षेप उपस्थित केले नाहीत. त्यानंतर सदस्य पर्यावरण जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, बैठकीत करण्यातआलेल्यासूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आली असून त्याचे ईतिवृत्त व रेकॉर्डींग जनतेकरिता प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, पहिलामाळा, उद्योगभवन, रेल्वेस्टेशनरोड, चंद्रपूर येथे थोड्या दिवसात उपलब्ध करून देण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्याबाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

**(उमाशंकर भादूले)**
समन्वयकपर्यावरणविषयक ,
जाहिरजनसुनावणी समिती
तथा प्रभारी उप-प्रादेशिक
अधिकारीचंद्रपूर ,मप्रनि मंडळ ,

**(मधुकर लाड)**
सदस्यपर्यावरणविषयक ,
जाहिरजनसुनावणी समिती
तथाप्रादेशिक अधिकारी ,
चंद्रपूर ,मप्रनि मंडळ

**(धनाजी पाटील)**
अध्यक्षपर्यावरणविषयक ,
जाहिरजनसुनावणी समिती
तथा अतिरिक्त
जिल्हादंडाधिकारीगडचिरोली ,